ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 5 | JANUARY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# छ.शाहू महाराज व फत्तेसिंह भोसले संबध- एक अभ्यास



**Prof.Dr. Ghatule S. S.**
**Mandesh Mahavidaly Junoni,**
**Tal. Sangola, Dist.Solapur.**

## प्रस्तावना :

छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचे रुपांतर पुढे साम्राज्यात झाले. स्वराज्य ते साम्राज्य या प्रवासात अनेक लढाया झाल्या, अनेकांना प्राणार्पण करावे लागले. स्वराज्य हे अनेक शूरवीरांच्या पराक्रमाची गाथा सांगणारे राज्य आहे कोणतेही राज्य निर्माण करावयाचे असेल तर एकटा राजा कधीच करु शकत नाही. त्यासाठी सहाय्यक माणसाची जोड लागते. मग ते मंत्री असतील, सरदार असतील, प्रधान असतील, सैनिक असतील या सर्वाच्या सहकार्याने राज्य स्थापन होते, विस्तारले जाते. शिवाजी महाराजांच्या काळात अनेक पराक्रमी व्यक्तिंमुळे स्वराज्याचे निशाण उभारु शकले. पुढे शाहू महाराजांच्या काळात बाळाजी विश्वनाथ, पहिले बाजीराव पेशवे, व बाळाजी बाजीराव अशा तीन पेशव्यांची कारकिर्दे होऊन गेली. शिवरायांच्या युध्दकौशल्याचा वारसा घेऊन लढणाऱ्या सरदारांमुळे पुढील काळात स्वराज्य विस्तारले. शिंदे, भोसले, होळकर, गायकवाड, दाभाडे, रास्ते, पटवर्धन, कवडे, विंचूरकर अशी किती तरी नावे आहेत, ज्यांनी पेशव्यांना मराठा साम्राज विस्तारासाठी मदत केली. त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोटचे फत्तेसिंह भासेले यांनीही आपल्या पराक्रम सिध्द केला आहे. प्रस्तूत शोधनिंबधात छ.शाहू महाराज व फत्तेसिंह भोसले यांच्या संबधावर प्रकाश टाकला आहे.

औरंगजेब बादशहा 20 फेब्रुवारी 1707 रोजी अहमदनगर येथे मरण पावला. त्यानंतर बादशहा बनलेल्या आझमशहाने शाहूची मोगली कैदेतून सुटका केली. सुटका होताच शाहू महाराज दक्षिणेच्या दिशेने निघाले. मार्गक्रमण करीत ते औरंगाबाद जिल्हातील शिवणी परगाण्यातील पारद या गावी येऊन पोहचले. शाहूने पारदच्या पाटलाला तटबंदी मोकळी करण्यास सांगितली पण ते त्यांनी ऐकले नाही. शाहूस त्यांनी प्रतिकार केला यात लोखंडे-पाटील ठार झाला. तेव्हा पाटलाच्या बायकोने आपला मुलगा शाहू महाराजांच्या पायावर घातला शाहुंनी त्यांना अभय दिले पारदच्या युध्दात फत्ते झाल्यामुळे त्यांचे नाव फत्तेसिंह असे ठेवण्यात आले [1] राज्याभिषेकानंतर (जाने. 1708) छ.शाहुंनी राज्यकारभार करण्यास सुरवात केली तेव्हा फत्तेसिंह भोसलेंना जून्नरपासून सासवड पर्यतच्या प्रदेशातील 720 गावाच्या सरपाटीलकीचे वतन 7 जुलै 1708 रोजी दिले [2] पुढे शाहू महाराजांनी त्यांना आपले आडनाव व अक्कलकोटची जहागिरी दिली. या संदर्भात सोलापूर जिल्हाच्या गॅझेटमध्ये पुढीलप्रमाणे संदर्भ आलेला आहे.

In 1712 shahu took Fatteshing into his family & gave him the family surname of Bhonsle & the Akkalkot state in here ditary jagir [3]

यांना फक्त अक्कलकोटची जहागिरीच दिली नाही तर शाहू महाराजांना दिल्लीच्या बादशहाकडून दख्खनच्या सहासुभ्याची चौथाई व सरदेशमुखीचे हक्क मिळाले होते. त्याचे वाटप शाहू छत्रपतींनी आपल्या सरदारामध्ये करुन त्यांचे क्षेत्र ठरवून दिले व त्यातीलच एक सुभा फत्तेसिंह भोसले यांना दिला होता. [4]

फत्तेसिंह सातारा दरबारी असताना शाहू महाराजांच्या दरबारी येणारे वतनाचे तंटे इनामाबाबतच्या गोष्टी, थोर सत्पुरुषासाठी वर्षासने यासाठी फत्तेसिंह भोसले स्थानिक अंमलदारांना सुचना देत असत. त्यातील काही उदाहरणे पुढे दिली आहेत. रायजी विरोजी माने आणि हेगोजी विरोजी माने या दोन बधूंचा तंटा वाळव्याच्या देशमुखाशी लागला होता. त्यासाठी गावाच्या देशमुखीबाबत विभागणी फत्तेसिंह भोसले यांनी करुन दिली. तंटा मिटविला हा तंटा व गावची विभागणी 18 ऑक्टोबर 1735 ला त्यांनी करुन दिली. [5]

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड पाच मध्ये या विषयाची माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे. विरेश्वर भट व मोरेश्वर भट यांना मौजे वेरवडे येथील जमीन कदीम इनाम होती. त्यात जाधवगीर निम्मे वाटा मागत होता. कदीम इनामास निम्मे वाटा मागावयाचा अधिकार

जाधवगिरीस नाही असे फत्तेसिंह भोसल्याने ठरवून राजपत्राप्रमाणे चित्रावाचे इनाम चालविण्याविषयी बजावले आहे. ही ताकीद त्यांनी सन 1728 मध्ये दिलेली आहे. त्या ब्राम्हणाच्या सेतास तगादा न लावणे राजपत्राप्रमाणे इनाम चालेल. तुम्ही कथला न करणे जाणीजे 26 मोहरम पा हुजूर. अशी ताकीद जाधवगीर यास फत्तेसिंह भोसले यांनी दिली आहे.

वरील उदाहरणावरुन स्पष्ट होते की, शाहू महाराजांच्या प्रशासकीय कामात फत्तेसिंहाची मोठी मदत होती. शाहू महाराजांनी फत्तेसिंह भोसल्यांस सनद दिली होती. ही सनद इतिहास संग्रह या ग्रंथात संपादक द.बा.पारसनिस यांनी दिली आहे. शाहू महाराजांनी त्यांना राजशक 75 मध्ये जी स्वदस्तुराची सनद दिली ती पुढीलप्रमाणे-

"स्वारी श्री राज्याभिषेक शके 75 विभव नाम संवत्सरे फाल्गुन वद्य दशमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणी श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री फत्तेसिंह भोसले यांसी-आशीर्वाद आज्ञा ऐसीजे तुमचे मानस स्वामीनी पुत्र करुन दौलत देऊन महात्पदारु केले. तेविसी अक्षई चालण्याचे खास दस्तुर व मुद्रांकित पत्र असावे म्हणोन चिटणीस याज पासोन विनंती केली. त्याजवरुन स्वामींनी चित्तात आणून ठरवून हे पत्र सादर केले असे" बित तपशील स्वामीस प्रसंगे करुन यवनाचेपाशी जाण पडले. तेथे पातशहानी वेजमीस महाल सानक करुन दिल्हा. त्यापैकी परगणे अक्कलकोट तुमचे बेजमीस पूर्वीपासून देऊन चालत आहे ते तुम्हाकडे दरोबस्त इनाम वंशपरंपरेने दिल्हा असे.

कलम 1

तुमचे निसबतीस सरदार पांढरे, बंडगर यैसे नेमून दिल्हे. त्याणी तुमचे पाशी असून तुम्हा बरोबर सेवा करावी.

कलम 1

सरंजाम महाल व गाव स्वराज्यातील मोकासे वगैरे तुम्हाकडे फौजदारीचे बेजमीस व खर्चास लाविले आहेत. ते नेहमी तुम्हाकडे फौजेचे बेजमीस व खर्चास चालावे. तुम्ही फौज घेवून (ठेऊन) त्यात राज्य साधनाचे उद्योग करावे.

कलम 1

तुम्हापाशी दरकदार व कारखानदार सर्व हुजरुन नेमून दिल्हे आहेत. त्याजपासून काम घ्यावे. ज्याची (त्यांनी) चाकरी करुन असावे.

कलम 1

सदरहूप्रमाणे चार कलमे केली आहेत. जाणिजे याप्रमाणे स्वामीनी तुम्हास कुलात घेवून राजपुत्र केले. "आज पा महालगाव सरंजाम दिल्हे व सरंजामी सरंदार दिल्हे. तर परगणे अक्कलकोट इनाम खाणे, फौजेचा सरंजाम सरंजाम व सरंजामी सरदार दिल्हे त्याप्रमाणे राज्य पदारुढ होतील ते तुम्हाकडे अकसई चालवितील. तुम्ही त्यापाशी राहून राज्यसाधना सेवा करणे आशीर्वाद (मोर्तब)." या वरील सदरेवरुन शाहू महाराजांचा फत्तेसिंहवार कीती दृढ स्वरुपाचा विश्वास होता हे लक्षात येते.

शाहू महाराजांनी फत्तेसिंह भोसले यांचे भावास पारद हा गाव इ.स. 1715 चे सुमारास इनाम करुन दिला. पारद गावची जी सनद आहे, तिच्यामध्ये तुमचे बाप व भाऊ मोगलाई तर्फेने लढत असता मृत्यू पावले. तुमच्यावर कसाला पडला. ह्याकरिता स्वामींनी कृपाळू होवून मौजे मजकूर हा गाव इनाम करुन दिल्हा आहे.[6]

शाहू महाराज व फत्तेसिंह भोसले यांच्यात नेहमी राजकीय घडामोडी, युध्द, चौथाई सरदेशमुखीबाबत चर्चा होत असत. दक्षिणेतील सहा सुभ्यापैकी कर्नाटक सुभा छ.शाहुंनी इ.स. 1713 मध्ये फत्तेसिंह भोसल्यांना दिल्यानंतर कर्नाटकातील खंडणी वसूल व्हावी व त्यांचे वर्चस्व निर्माण व्हावे यासाठी कर्नाटक मोहिमेचे नियोजन फत्तेसिंह व पेशवे यांच्यावर सोपविले. इ.स. 1725 ते 1726 या काळात पहिली चित्रदुर्गची स्वारी तर नोव्हें 1726 ते एप्रिल 1727 या काळात श्रीरंगपट्टणची स्वारी केली. या स्वाऱ्यामुळे पश्चिम व मध्य कर्नाटकच्या भागात मराठ्यांनी आपले चौथ व सरदेशमुखीचे हक्क लागू केले व पुढील मोहिमा यशस्वी करण्यास ही मोहिम उपयुक्त ठरली.[7] या मोहिमेनंतर गोवळकोट व अंजनवेल हे किल्ले स्वराज्यात आणण्याची जबाबदारी फत्तेसिंहावर सोपविली ती जबाबदारी ही त्यांनी यशस्वीपणे पार पाडली.

शाहू महाराजांची राणी विरुबाई (रक्षा) हिला पुत्र नसल्याने ती फत्तेसिंहाला पुत्राप्रमाणे मानत होती. 24 डिसें. 1740 रोजी विरुबाई मृत्यू पावली. तेव्हा फत्तेसिंह भोसले कर्नाटकच्या स्वारीत होते. त्यांना ही बातमी ऐकुन फार वाईट वाटले विरुबाईचे उत्तरकार्य फत्तेसिंहाकडून करण्यात आले व विरुबाईची सर्व संपत्ती त्यांना देण्यात आली. फत्तेसिंह भोसले यांनीही त्यांचे देव्हाऱ्यात विरुबाईची सोन्याची मूर्ती करुन बसविली.[8] यावरुन स्पष्ट होते की, फत्तेसिंग भोसले यांना विरुबाई व छ.शाहू महाराजांनी मुलाप्रमाणे वागविले होते.

शाहू महाराजांचा फत्तेसिहावर विश्वास होता. तर फत्तेसिंहाला शाहूबाबत आत्मियता व आपलेपणा वाटत होती. शाहूराजांनी त्यांचा पुत्रवत सांभाळ करुन 1719 मध्ये विवाह केला. एवढी जवळीक असूनही शाहू महाराज निपूत्रीक असल्याने त्यांनी भावी छत्रपती कोण असावा याची चाचपणी करण्याची जबाबदारी गोविंदराव चिटणीसावर सोपविली त्यांनी फत्तेसिंहाला विचारपूस केली पण फत्तेसिंहानी स्पष्ट नकार दिला.[9] अक्कलकोट संस्थानाला स्वतंत्र दर्जा मिळाला तो फत्तेसिंह भोसले यांच्या कामगिरीमुळेच बाळाजी विश्वनाथ, पहिले बाजीराव पेशवे आणि नानासाहेब पेशवे या तीन पेशव्यांच्या कारकीर्दित स्वतंत्रपणे त्यांच्या बरोबर युध्दात, स्वारीत सहभाग घेतला होता. फत्तेसिंह भोसले यांची राजकीय कारकीर्द सन 1712 ते 1760 पर्यंतची आहे. शाहू- बाजीराव यांच्या कारकीर्दीचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी गुणी व पराक्रमी माणसे राज्यकारभारात आणली. स्वराज्यविस्तारात अनेक व्यक्तिंनी लहान, मोठी पथके घेउन दक्षिणभर मोगलांना हैराण करुन सोडले. यात फत्तेसिंह भोसलेचा अग्रक्रम लागतो. या कारकिर्दीत त्यांनी कर्नाटक, बुंदेलखंड, हैद्राबाद, आसाम त्रिचनापल्ली इ. प्रांतावर यशस्वीरित्या स्वाऱ्या केल्या.

शाहू महाराज व फत्तेसिंह भोसले यांचे घनिष्ठ संबंध होते. त्यांच्यात नेहमी राजकीय घडामोडी, युध्द, चौथाई, सरदेशमुखी याबाबत चर्चा होत होती. फत्तेसिंहाना अनेक ठिकाणचे सरंजाम दिले. स्वतंत्र अशा अक्कलकोट संस्थानचे संस्थापक होण्याचा मान मिळाला तो छ.शाहू महाराजामुळेच. एवढे सर्व असूनही फत्तेसिंहानी छत्रपती पदाची इच्छा व्यक्त केली असती तर ते दिलेही असते पण त्यापासून फत्तेसिंह अलिप्त राहीले.

**संदर्भ :-**

(1) हेरवाडकर र. वि. थोरले शाहू महाराज यांचे चरित्र, व्हिनस प्रकाशन, पुणे, 1976, पृ.क्र. 72.
(2) सरदेसाई गो.स. मराठी रियासत, खंड III, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 2012, पृक्र. 62.
(3) महाराष्ट्र स्टेट गॅझेट, सोलापूर, 1984, पृ.क्र. 509.
(4) खोबरेकर वि.गो. महाराष्ट्राचा इतिहास, मराठा कालखंड, भाग II, म.रा.सा. व संस्कृती मंडळ, मुंबई, 1988, पृ.क्र. 55.
(5) खरे वा.वा. भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे, ऐतिहासिक संकिर्ण साहित्य खंड-V, 1944, पृ.क्र. 43, 44.
(6) पारसनिस द.बा. इतिहास संग्रह, अंक-3, ऑक्टोबर 1909, पृ.क्र. 5 ते 7.
(7) सरदेसाई गो.स. मराठी रियासन खंड-III पृ.क्र. 276.
(8) वि.ल.भावे (प्रका.), मराठी दफ्तर रुमाल पहिला, लेखांक-1 पृ.क्र.-134
(9) सातारच्या पंतप्रतिनिधी घराण्याचा इतिहास भाग-V पृ.क्र. 208, 209.